# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 31 ) 15th March 2006 ( No : 01

# वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा खुलासा

*महाराष्ट्र विधानपरिषद : सोमवार , दिनांक १२ डिसेंबर २००५ : तिसरे अधिवेशन , २००५*

(१) * ९२८८ **प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. सुधाकर गणगणे : तारांकित प्रश्न क्रमांक ५५७७ ला दिनांक १५ जुलै २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षण संचालकांच्या परिपत्रकामध्ये वरिष्ठश्रेणीत ५ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर निवडश्रेणीत स्थान निश्चिती करण्यात येईल, या वाक्याऐवजी वरिष्ठश्रेणीत ५ वर्षाची सेवा असण्याची आवश्यकता नाही, अशी सुधारणा करण्यात आल्यानंतर व शासनाने सुध्दा दिनांक १७ जून २००५ च्या पत्रान्वये तसा खुलासा करणा-या सूचना दिल्यानंतरही या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अजूनही झालेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विलंब होण्याची निश्चित कारणे काय आहेत,

(३) नसल्यास, या शासन खुलाशाप्रमाणे आतापावेतो विभागवार किती प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत,

(४) प्रलंबित असलेल्या विभागवार प्रकरणांची संख्या किती आहे ?

**श्री. सुरेश शेट्टी ........ श्री. दिलीप वळसे-पाटील यांचेकरिता** : (१), (२) व (३) शासनाने दिनांक १७.६.२००५ च्या पत्रान्वये केलेल्या खुलाशानुसार संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कार्यवाही सुरु केली आहे. दिनांक ३१.८.०५ पर्यंत विभागीय स्तरावरुन महाविद्यालयाकडून प्रकरणांची माहिती घेण्यात आली. त्यानुसार ८०६९ अधिव्याख्यात्यांची माहिती महाविद्यालयांनी सादर केलेली आहे. छाननीअंती त्यापैकी सुमारे ४६६० अधिव्याख्यात्यांना लाभ मिळेल. या अधिव्याख्यात्यांची प्रकरणे त्यांच्या सेवापुस्तकानुसार तपासून त्यांचे निवडश्रेणीतील स्थान निश्चितीचे आदेश देण्यात येतील. प्रकरणांची संख्या जास्त असल्याने विलंब होत आहे.

(४) मुंबई ७२८, पुणे १०४२, कोल्हापूर १०६१, औरंगाबाद ३६३, जळगांव ४१०, नागपूर ५७३, अमरावती २५१, नांदेड २३२ अशी एकूण ४६६० प्रकरणे आहेत.

**श्री. सुरेश शेट्टी** : महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो :–

प्रश्न क्र. ४ च्या उत्तरामध्ये सुरुवातीला "एकूण प्रस्ताव ४६६० असून त्यातील १९८१ प्रकरणांमध्ये कार्यवाही झालेली आहे व २६७९ प्रकरणे प्रलंबित आहेत" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

**प्रा. बी.टी. देशमुख** : महोदय, माझी जी माहिती आहे त्याप्रमाणे एकाही बावतीत करेक्शन होऊन या शिक्षकांचे वेतन सुरु झालेले नाही. खरे म्हणजे मागील वेळी **१५ जुलै, २००५ रोजी माननीय मंत्री महोदयांनी एक महिन्याच्या आत ही प्रकरणे निकाली काढून एक महिन्यात तशी सुधारित वेतनश्रेणी त्यांना देण्यात येईल असे सांगितले होते.** त्यांची थकबाकी एक महिन्यात दिली जाणार काय? असा प्रश्न विचारला होता त्याला 'होय' असेही उत्तर माननीय मंत्री महोदयांनी त्यावेळी दिले होते. आज मंत्री महोदय म्हणतात की, १९८१ प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय झाला आहे परंतु राज्यात तो निर्णय एकाही ठिकाणी लागू झालेला नाही. ही माझी पक्की माहिती आहे. याबाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. त्याप्रमाणे दिनांक ७.१२.१९९९ रोजी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी प्राध्यापक संघटनेला लेखी आश्वासन दिले. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "Government of India's suggestion on "revision of pay scales of teachers in Universities and Colleges following the revision of pay scales of Central Government employees on the recommendations of the 5th Central Pay Commission dated 27th July, 1998 as amended vide letter dated 6th November, 1998 including UGC's notification dated 24th December, 1998 would be implemented by the State Government with recommended scales of pay as composite scheme with effect from 1.1.1996". आता २४ डिसेंबर १९९८ चे नोटिफिकेशन कॅबिनेटने मंजूर केले. त्यामध्ये ती समग्रसेवा धरली गेली पाहिजे. निवडश्रेणी मध्ये स्थाननिश्चिती करण्यासाठी वरिष्ठश्रेणीमध्ये ५ वर्षे सेवा झाली नसली तरी चालेल व त्याप्रमाणे जी.आर.काढला परंतु संचालकांनी १४ फेब्रुवारी रोजी एक चुकीचे परिपत्रक काढले. शासनाने ते परिपत्रक रद्द केले व एक महिन्यात नविन दुरुस्त वेतन करतो असे म्हटले पण आजपर्यंत एकाही प्रकरणी दुरुस्ती करण्यात

**Nagpur University Teachers' Association**
**MEETING NOTICE : 1**
Dated : 25.03.2006

From :
**Prof. Dr. E. H. KATHALE**
Secretary, NUTA
N-162, Reshim Bag, Nagpur-444 009
To,
All the members of the
Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.E. H. Kathale**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting:***
***12.00 Noon on Sunday, the***
***21st May, 2006***

आलेली नाही. उच्च शिक्षण संचालकांनी त्यांच्या टेबलवरच फिक्सेशन करुन दिले आहे त्या प्रकरणांची संख्या १९८१ एवढी सांगितली. त्या प्रकरणी नविन फिक्सेशन झालेले आहे, असे त्यांनी आता सांगितले. ज्या १९८१ प्रकरणाच्या बाबतीत फिक्सेशनची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. त्यांच्याबाबतीत आठ दिवसात त्यांच्या वेतन पत्रकात दुरुस्ती केली जाईल काय?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते खरे आहे. आम्ही या सभागृहात १५ जुलैला आश्वासन दिले होते की, एक महिन्यामध्ये काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. परंतु यासंदर्भातील प्रक्रिया सुरु झाल्यानंतर आम्हाला माहिती पडले की, यामध्ये खूप जास्त काम आहे. तसेच यासंदर्भात पेंडींग केसेस ८००० होत्या. यासंदर्भात आम्ही स्क्रुटीनी केली, कॉलेजकडे यासंदर्भात मागणी करुन सुध्दा कॉलेजकडून माहिती वेळेवर आली नाही. त्यानंतर आम्ही फिल्डवर सर्व माहिती गोळा केली. आतापर्यंत खात्याकडे ८८६९ केसेस आलेल्या आहेत. त्यामध्ये आम्ही ४६६० प्रपोजल क्लिअर केलेली आहेत. यामध्ये २६७९ प्रकरणे बाकी आहेत ती ३ महिन्यात पूर्ण केली जातील. कार्यवाही पूर्ण करण्याच्या संदर्भातील काम जोरात चालू आहे.

**प्रा. बी.टी.देशमुख :** माननीय राज्य मंत्रीमहोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात थोडासा गोंधळ घातलेला दिसतो. ज्या कॉलेजांनी किंवा ज्यांनी किंवा ज्यांची माहिती वेळेवर पाठविली नाही त्या संदर्भात मी बोलत नाही आपण सांगितले की, हे काम एक महिन्यात पूर्ण करु आता मी त्या संदर्भात काही बोलत नाही. आपण मघाशी असे सांगितले की, आम्ही १९८१ प्रकरणे क्लिअर केलेली आहेत. त्यावरील कार्यवाही झालेली आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी मुद्देसुद उत्तर दिले पाहिजे. तुम्ही एक महिन्यात काम पूर्ण करु असे सांगितल्यानंतर महाराष्ट्रात एक सुध्दा प्रकरण क्लिअर झालेले नाही. जी १९८१ प्रकरणे आता क्लिअर झालेली आहेत असे आपण म्हणता ती तुमच्या टेबलावरच क्लिअर झालेली आहेत. जी १९८१ प्रकरणे क्लिअर केलेली आहेत **त्या प्रकरणांच्या संदर्भात ८ दिवसात त्यांच्या वेतनपत्रकात दुरुस्ती करुन त्यांना दुरुस्तीप्रमाणे वेतन सुरु होईल काय?**

**श्री. सुरेश शेट्टी :** महोदय, **आठ दिवसात नाही परंतु पुढच्या महिन्यापासून सुरु होईल.**

**प्रा. बी.टी.देशमुख :** १९८१ प्रकरणे आपण क्लिअर केलेली आहेत असे म्हणता त्यांना पुढच्या महिन्यापासून दुरुस्ती प्रमाणे लाभ मिळेल असेच आपण आता सांगितलेले आहे ना?

**श्री. सुरेश शेट्टी :** होय.

**प्रा. बी.टी.देशमुख :** मग माझा प्रश्न असा आहे की, अजूनपर्यंत २६७९ प्राध्यापकांच्या बाबतीत प्रकरणे तुमच्याकडे आली पण तुमचा निर्णय झालेला नाही. आपल्याकडे ७-८ जॉईंट डायरेक्टर, त्यावर डायरेक्टर बसलेले आहेत. या प्रकरणाच्या संदर्भात ६-७ वर्षे अगोदरच विलंब झालेला आहे, यामध्ये चुकीची पत्रके सुध्दा काढण्यात आलेली आहेत खरे म्हणजे या प्रश्नाच्या संदर्भात आपण तत्परतेने कार्यवाही करुन घेतली पाहिजे. उच्च शिक्षण संचालकांच्या टेबलावर आता जी १९८१ प्रकरणे आहेत त्या प्रकरणांच्या बाबतीत अजून काहीच झालेले नाही. १९८१ प्रकरणांच्या संदर्भात पुढच्या महिन्यात कार्यवाही होईल असे आपण आता सांगितलेले आहे. परंतु या उर्वरित २६७९ प्रकरणांच्या संदर्भातील कार्यवाही एक दीड महिन्यात पूर्ण केली जाईल काय?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भातील काम जोरात चालू आहे. ही प्रपोजल क्लिअर होण्यासाठी ३ महिन्याचा कालावधी लागेल.

**श्री. मधुकर चव्हाण :**सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो बरोबर आहे. आपल्याकडे जे नवीन डायरेक्टर आलेले आहे त्यांचे काम अतिशय चांगले आहे. यासंदर्भात मला सांगावयाचे आहे की, रिझर्व्हेशनच्या ज्या पोस्ट आहेत त्या अपडेट करण्यासाठी त्यांना ५-१० वर्षे लागली. परंतु सिलेक्शन ग्रेड करतांना ती रिझर्वेशन अगेन्स्ट ती पोस्ट धरली जाते असे जॉईंट डायरेक्टर सांगतात त्यामुळे अशा त-हेच्या तांत्रिक मुद्यावर छोटया मोठया गोष्टी असतील तर त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशा प्रकारचा निर्णय आणि आदेश दिला जाणार आहे का?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, या सदनात १५ जुलैला उत्तर देण्यात आले होते त्यामध्ये असे सांगण्यात आले होते की, ज्या टेक्नीकल महत्वाच्या केसेस असतील आणि त्यांच्या संदर्भात चुकीची ऑर्डर काढली गेली असेल तर त्यासाठी एक कक्ष निर्माण केला गेला तसेच एक कमिटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यांची एक कमिटी नेमली गेली असून अशी प्रक्रिया पुढे येणार आहे व ही कमिटी यावर योग्य तो निर्णय करेल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, २६७९ प्रकरणांच्या बाबत ३ महिन्यामध्ये कारवाई करू असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे यामध्ये अस्पष्टता राहू नये असे मला वाटते. मंत्रिमहोदयांनी काही कारण नसतांना ३ महिन्यांचा कालावधी लागेल असे सांगितले आहे. या विषयी मी वाद घालत नाही. २६७९ प्राध्यापकांच्या प्रकरणात निर्णय करण्याचे काम तीन महिन्यामध्ये पूर्ण केले जाईल असे मंत्रिमहोदय म्हणाले ते बरोबर आहे का?

**श्री.सुरेश शेट्टी :** होय.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मग माझा पुढचा प्रश्न हा यामुळे येणाऱ्या फरकासंबंधीचा आहे. म्हणून मी मंत्रिमहोदयांना मुद्दामहून प्रश्न विचारणार आहे. कारण या प्रकरणांच्या थकबाकीसंबंधी देखील ते वेळ मागून घेतील. म्हणून थकबाकीचे प्रकरण केव्हा अंतिम केले जाईल?

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, टोटल केसेसेची स्क्रुटीनी झाल्यानंतर एक्झॅक्ट फिगर समोर आल्यानंतर पुढच्या बजेटमध्ये यासंबंधी तरतूद केली जाईल.

**श्री.नानासाहेब बोरस्ते :** सभापती महोदय, निवडश्रेणीत स्थान निश्चिती करण्याबाबतचा प्रश्न आहे. या संपूर्ण प्रकरणासाठी किती रकमेची तरतूद केली आहे व ती केव्हा उपलब्ध होणार आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, मी आताच सांगितले की, टोटल केसेसची स्क्रुटीनी झाल्यानंतर आम्हाला संपूर्ण प्रकरणांचा निश्चित आकडा समजणार आहे. त्यानंतर मग पुढील बजेटमध्ये तरतूद केली जाईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, करेक्शन न झाल्यामुळे थकबाकी राहिली आहे. माझे असे म्हणणे आहे की, कारण नसतांना ही थकबाकी मागे रेंगाळत आहे. चूक केल्यामुळे करेक्शन निघत आहे. त्याची तरतूद करून पुढच्या बजेट नंतर ही व्यवस्था आपण कराल ही गोष्ट खरी आहे ना?

**श्री.सुरेश शेट्टी :** होय.

**प्रा.जोगेंद्र कवाडे :** सभापती महोदय, वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थाननिश्चिती करण्यासंबंधीचा प्रश्न आहे. यासंबंधी एक महिन्यामध्ये कारवाई केली जाईल असे योग्य उत्तर मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. या संदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यांची एक समिति नियुक्ती करण्यात आली होती. जी गोष्ट संचालक किंवा त्यांचे अधिकारी स्वतः तपासणी करून करू शकतात त्या गोष्टीसाठी पाच जणांची कमिटी नेमून त्यास विलंब लावण्याचे कारण काय आहे ? सदर प्रश्न टोलविण्यासाठी शासनाने समिती नेमली नाही ना?

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, तीन महिन्यामध्ये काम पूर्ण करणार आहोत. एकूण किती प्रकरणे आहेत, त्यांची छाननी करण्यासाठी समिती नेमलेली आहे. सदर समिती चांगल्या प्रकारे काम करीत आहे. येत्या २-३ महिन्यामध्ये संपूर्ण कार्यवाही पूर्ण होईल.

**प्रा.जोगेंद्र कवाडे :** सभापती महोदय, सभागृहात थातूरमातूर उत्तर देता कामा नये. एक महिन्यामध्ये, ३०-३५-४० दिवसामध्ये काम पूर्ण करू असे ठोस उत्तर दिले पाहिजे.

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, तीन महिन्यामध्ये काम पूर्ण करण्यात येईल.

**श्री.रामनाथ मोते :** सभापती महोदय, अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थान निश्चिती प्रकरणासंबंधीचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही प्रश्न मंत्रिमहोदयांनी आपल्या टेबलावर डिस्पोज ऑफ केली आहेत, काही बाकी आहेत. शासन निर्णय चुकीचा केल्यामुळे किंवा शासकीय अधिकाऱ्यांनी चुकीचा अर्थ लावून निर्णय घेतल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे हे खरे आहे का ?

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये या विषयावर एक तास चर्चा झाली. जी.आर.मध्ये त्रुटी होत्या म्हणून ही परिस्थिती निर्माण झाली.

**श्री.व्हि.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक ३४ वर असलेल्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. टप्प्याटप्प्याने अनुदानावर येणाऱ्या महाविद्यालयांच्या संबंधीचा प्रश्न आहे. सन १९९८-९९ साली टप्प्याटप्प्याने अनुदानावर

# वरिष्ठ श्रेणीतुन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा खुलासा

*महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार, २१ मार्च २००६ : पहिले अधिवेशन २००६*

(१) * १२८६९ **श्री. सुधाकर गणगणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.ऐनापूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ९२८८ ला दिनांक १२ डिसेंबर, २००५ रोजी, दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च शिक्षणमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१) उच्च शिक्षण संचालकांच्या परिपत्रकामध्ये वरिष्ठश्रेणीत ५ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर निवडश्रेणीत स्थान निश्चिती करण्यात येईल, या वाक्याऐवजी वरिष्ठश्रेणीत ५ वर्षाची अट असण्याची आवश्यकता नाही, अशी सुधारणा करण्यात आल्यानंतर व शासनाने सुद्धा १७ जून २००५ च्या पत्रान्वये तसा खुलासा करणाऱ्या सूचना दिल्यानंतर या आदेशाच्या प्रत्यक्ष अम्मलबजावणीची सद्यस्थिती काय आहे,

२) अम्मलबजावणी झाली नसल्यास, याबाबत विलंब होण्याची निश्चित कारणे काय आहेत,

३) शासन खुलाशाप्रमाणे आतापावेतो विभागवार किती प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत,

४) अजूनही प्रलंबित असलेल्या विभागवार प्रकरणांची संख्या किती आहे?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

(२) प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली असल्यामुळे विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) पुणे : ११७७ मुंबई : ८१६, कोल्हापूर : १०६१, औरंगाबाद : ३१६, नांदेड : २५६, जळगांव : ४९०, नागपूर : ५७३, अमरावती : २८५

वरीलप्रमाणे एकूण ४९७४ प्रकरणे निकालात काढलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**श्री. सुधाकर गणगणे** : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये, दिलेली आकडेवारी निरनिराळ्या स्तरावरील ४९७४ प्रकरणे निकाली काढल्याबाबत देण्यात आल्याचे सांगितले आहे. सभापती महोदय, ही आकडेवारी फक्त टेबलवर काढलेली आहे. तरी माननीय मंत्रीमहोदयांना माझा प्रश्न आहे की, ज्यांना प्रत्यक्षात फायदा मिळायला पाहिजे होता, त्यांना याचा फायदा मिळाला नाही, हे खरे आहे का?

**श्री. सुरेश शेट्टी** : सभापती महोदय, दिलेले आकडे हे महाराष्ट्रातील फॅक्च्युअल प्रकरणांचे आकडे आहेत.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, ज्यांच्या केसेस किंवा ज्यांची प्रकरणे आलेली नाहीत, ज्यांची माहिती वेळेवर आली नाही त्यांच्याबद्दल मी बोलत नाही. या संदर्भातील ४९७४ प्रकरणे निकालात काढलेली आहेत, असे आपल्या उत्तरात आपण म्हटले आहे. याचा अर्थ वेतननिश्चितीमधे दुरुस्ती झाली व त्याप्रमाणे वेतन दिले जाते का? "वेतनपत्रकात आठ दिवसांत नाही पण पुढच्या महिन्यापासून दुरुस्ती करू". असे आपण १२ डिसेंबर २००५ रोजी सभागृहात सांगितले होते. तरी, त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे का?

**श्री. सुरेश शेट्टी** : होय.

**प्रा.बी.टी.देशमुख** : ठीक आहे. मग या संदर्भात करण्यात आलेल्या दुरुस्तीप्रमाणे वेतन दुरुस्तीचा प्रश्न संपला आहे. सभापती महोदय दिनांक २४ डिसेंबर, १९७८ ला यु.जी.सी. चे जे नोटीफिकेशन आहे. त्याप्रमाणे राज्याच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. परंतु डायरेक्टरने चुकीचे परिपत्रक काढले. या संदर्भात शासनाने दिनांक १७ जून २००५ ला खुलासा केला. माननीय मंत्रीमहोदयांनी स्वतः ही सर्व कागदपत्रे पाहून संबधितांकडून क्लेरिफिकेशन मागितले. चूक दुरुस्त करा, असे त्यांनी सांगितले आणि त्याप्रमाणे चूक दुरुस्त झाली. आता या प्रकरणी वेतन निश्चितीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे वेतन मिळत आहे असे आपण सांगितले. थकीत बाकी पुढच्या बजेटनंतर देऊ असे माननीय राज्य मंत्रीमहोदयांनी १२ डिसेंबर २००५ ला म्हटले होते. तरी त्याप्रमाणे आता थकीत बाकी ३ महिन्यांत दिली गेली आहे का? आणि दिली नसेल तर किती दिवसांत देण्यात येईल?

**श्री. सुरेश शेट्टी** : सभापती महोदय, या संदर्भातील कॉस्ट साडे सत्तावीस कोटी रुपयांची आहे. या संदर्भात आपल्याला बजेटरी प्रोव्हीजनमध्ये काही करावे लागेल. त्याप्रमाणे आता आम्ही करुन घेऊ.

**प्रा. बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मागील वेळीही माननीय मंत्रीमहोदयांनी या संदर्भात बजेटनंतर कार्यवाही करू असे सांगितले होते. एखादा निश्चित असा कालखंड दिला तर विभाग त्याप्रमाणे काम करतो. तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना पुन्हा प्रश्न आहे की, या संदर्भातील कार्यवाही किती दिवसांत पूर्ण केली जाईल?

**श्री. सुरंश शेट्टी** : सभापती महोदय, पुढील सप्लीमेंटरी बजेटमध्ये आम्ही हे घेणार आहोत.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, आता तिसरा महत्त्वाचा प्रश्न उच्च शिक्षण संचालकांनी देऊ नका, असे म्हटले असतांना देखील काही जॉईंट डायरेक्टर्सनी आर्थिक गैरव्यवहार करुन निवडक लोकांना ही सवलत देऊन टाकली. त्यांना शोधून त्यांच्यावर ॲक्शन घेण्याबाबत मागच्या वेळी सांगण्यात आले होते. डायरेक्टरने चुकीचे परिपत्रक काढले तर जाईंट डायरेक्टरांनी परिपत्रकाच्या विरोधात जावून काही निवडक लोकांबरोबर व्यवहार केले व त्यांना निवडश्रेणी दिली, हे काही बरोबर नाही. मागील वेळी देखील मी हे सांगितले होते. असे त्यांनी केले असेल तर त्यांची एक महिन्याच्या आत चौकशी करू असे आश्वासन देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे चौकशी करण्यात आलेली आहे काय? व त्यांच्यावर ॲक्शन घेतली आहे काय? ॲक्शन घेतली असेल तर काय ॲक्शन घेतलेली आहे? नसेल तर विलंबाची कारणे काय?

**श्री. सुरेश शेट्टी** : सभापती महोदय, सभागृहामध्ये आदरणीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात आश्वासन दिले होते. त्या संदर्भात आम्ही चौकशी करुन २५ ऑक्टोबर, २००५ रोजी डायरेक्टर, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमलेली आहे. सदर कमिटीचा अहवाल १ महिन्यामध्ये येईल, त्यानंतर यामध्ये जे जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

**श्री. व्ही.यु.डायगव्हाणे** : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक जिल्ह्यामध्ये उपस्थित झालेला आहे. विशेष करुन नागपूर जिल्ह्यामध्ये या संदर्भातील बऱ्याच केसेस आहेत. याबाबत अजून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून या प्रकरणांची चौकशी करुन १ महिन्याच्या आत कार्यवाही करण्यात येईल काय?

**श्री. सुरेश शेट्टी** : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, फक्त नागपूर जिल्ह्याच्या संदर्भातच चौकशी करणार नाही तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये याबाबतीत गोंधळ झालेला असला तरी सर्वांची चौकशी करण्यात येईल. कमिटी स्थापन केलेली आहे त्याचा अहवाल एक महिन्यामध्ये येईल. अहवाल आल्यानंतर पुढील एक महिन्यांमध्ये सर्वांवर कारवाई करण्यात येईल.

******

---

आलेल्या महाविद्यालयांना अद्यापि अनुदान मिळालेले नाही. सन २००२-२००३ मध्ये १०० टक्के महाविद्यालये अनुदानावर आली आहेत. परंतु, त्या महाविद्यालयातील कर्मचारी, प्राध्यापक यांना अनुदान दिलेले नाही. तेव्हा येत्या बजेटमध्ये यासंबंधी तरतूद केली जाईल का?

**श्री.सुरेश शेट्टी** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्नांशी संबंधित प्रश्न विचारलेला नाही. मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मला दालनात भेटल्यास मी त्याचे उत्तर देईन.

******

# ORIENTATION OF TEACHERS MOVEMENT

**Prof. Amiya Dasgupta**

Indian teachers' movement has come of age and it is time that there is a full frank discussion about its scope, its perspective and tasks, its proper orientation, I am putting below some of my thoughts on the same just to initiate a discussion.

Teachers' movement in our Country until now predominantly trade oriented and it is rightly so. Though generally in India we not use the term 'Trade Union' with activities and functions of Teachers' Organisations a sort of psychological resistance to the use of the term is still there – what Teachers' Organisation mainly do are in essence trade union activities, fighting for better emoluments and service conditions, against victimisation, or democratisation management etc. In course of the last two decades, specially during last 10/15 years, teachers' movement and organizations have grown tremendously throughout India covering all sectors of teacher, with increasing sweep and militancy. This was possible because throughtout India heroic battles were fought by thousands of teachers against abnormally low pay subnormal service condition and undemocratic management. It is through these struggles that teachers' organizations grew into mighty mass organisations tinting under their banner hundreds and thousands of teachers of different shades of opinion.

Today we can confidently say, that this is true in India for all sectors of teachers primary, secondary, college and University, not only at the same level but also at the national level, though there might be some difference in degree of unity achieved in different sectors.

So this trade union activity has played a very vital role in building Indian teachers' movement and teachers' organizations in the past, it will continue to play an important part in future also. Any attempt to minimize the role will be wrong, it is just not merely a movement to better economic condition by sections of people it is a movement which unites 3 million Indian teachers, who come mostly from the working people and lower middle classes, in mighty mass organizations thus building an important component in the battle for democracy and social advance in India.

But while fully realizing the great importance of this trade union orientation and tasks of the teachers' movement, we have to sharply raise the question – is it the sole tasks or even the overwhelmingly dominant task of teachers' movement to the practical exclusion of other tasks? To this question the answer is an emphatic No. Teachers' movement have other important

### *अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून होत असलेला विलंब*

**महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५**

**मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २००५**

रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील तारांकित प्रश्न क्रमांक

(७) * ९२९१ **श्री. नतिकोद्दीन खतिब , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते, दिनांक २३ जुलै, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २९ जुलै, २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील ता.प्र.क्र.५६०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दि. ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) होय,

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाने संबंधित महाविद्यालयांनी/विद्यापीठांनी पद आरक्षित करण्याबाबतचे सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत व शासनाने त्यावर कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत, त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने फेरप्रस्ताव मागितला आहे.

******

### *वेतन योजनेच्या माध्यमातून वेतन अदा न केल्याबाबत*

***महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५***

***मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २००५***

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्यासोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील तारांकित प्रश्न क्रमांक*

(१५) * ९३४६ **श्री. सुधाकर गणगणे , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) शंभर टक्के वेतन अनुदानावर आलेल्या अनुदानित महाविद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिनांक २१.९.७७ च्या शासननिर्णयाप्रमाणे वेतन योजनेच्या मार्फतच वेतन अदा करणे बंधनकारक असतांना सुद्धा योजनेच्या माध्यमातून वेतन अदा केले जात नाही अशी तक्रार करणारे एक निवेदन संत भगवानबाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिनांक २९ जुलै, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान मा. संचालक उच्च शिक्षण यांना सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांचेमार्फत सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन योजनेप्रमाणेच वेतन अदा केले जावे असे स्पष्ट आदेश मा. उच्च शिक्षण संचालकांनी दिनांक ४ एप्रिल, २००५ च्या आदेशान्वये दिलेले असतांना त्याची अंमलबजावणी महाविद्यालय करीत नाही असेही उक्त तक्रारीत नमूद करण्यात आलेले आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केली आहे,

(४) उपाययोजना केली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे पाटील** : (१) होय.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर महाविद्यालय २००४-०५ या वर्षी १०० टक्के अनुदानावर आले आहे. संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे आदेश क्रमांक बीयुडी/२००५/६७८९०/आ.त./लेखा-२ दिनांक ३० जुलै २००५ अन्वये अनुदान मंजूर करुन संबंधित महाविद्यालयाला सुपूर्द करण्यात आले आहे. अनुदान प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयांच्या कर्मचा-यांना माहे **मार्च २००५ ते ऑक्टोबर २००५ पर्यंतचे वेतन कर्मचा-यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आले आहे त्यामुळे सद्यःस्थितीत कर्मचाऱ्यांची वेतनविषयी कोणतीही तक्रार नाही.**

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

tasks to perform also. These are (I) academic tasks, (II) ideological political tasks, (III) national international tasks. About all these tasks till now there has been inadequate realization and performance.

**ACADEMIC TASKS**

Academic tasks include apart from continuous efforts to improve the quality of teaching impaired to students, persistent fight for having a scientific and democratic system of education with progressive national democratic content, through intervention by the teachers' organizations in the formulation of curricula and syllabi, and preparation of proper text books. This is also includes study and research into the economic social and professional situations of teachers, as well as their struggles, their demands and the pedagogic and scientific problems of education.

Now, so long, how far have we intervened in this direction? Our intervention, till now, is in generally limited to passing resolutions at conferences demanding a national democratic and scientific system for education and suggesting some principles e.g. our text books should be free of casteist, communalist bias and should say something about freedom struggle, we should oppose neo-colonialist penetration in the educational life of our country, our education should be production oriented etc. But beyond this we have not concentrated our demands, recently AIFUCTO, in its different memoranda submitted to the Government has been demanding teachers' organisation's active co-operation should be sought by the Governments at different level, in formulating the content curricula and syllabi of education, and in these vital matters teachers should just not be objects of decisions arrived at by Government officials and 'experts' also where, It is with this view in mind that AIFUCTO has demanded representation of national teachers' organizations in CASE and AIFUCTO's representation in U.G.C.

This is of course a good modest beginning, but in the context of a strongly negative attitude of the authorities towards these demands, how far have we planned to build a movement on these issues? Or how far has this consciousness percolated to the ranks of the organised teachers' movement, that we should launch struggles for the fulfilment of this demands just as we launched struggles on the issue of pay scales? It has to be frankly stated, that till now the response on the issue from masses of teachers and even leadership of teachers' movement is inadequate, though it is absolutely correct to state that teachers struggles for democratising the content of education is as important as their struggle for better service conditions. There is another very important aspect of this matter. Simultaneously with carrying on our movement demanding to the Central and State government association of teachers' organisations in the task of determining the content of education state level teachers' association can set up subject wise teams or subcommittees to go into the prescribed syllabi, text book, etc and suggest concrete changes and if necessary alternative syllabi etc. At the national level national teachers' organisations can similarly set up teams to go into the question of formation of national policy on education.

## निवडश्रेणीतील मान्यताप्राप्त स्थाननिश्चितीपोटी अदा करावयाची वेतन फरकाची रक्कम अदा न करता शासनाकडे परत पाठविल्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५*

*शुक्रवार , दिनांक ९ डिसेंबर २००५*

(९) * ९२९२ **श्री. नतिकोद्दीन खतिब , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते** : सन्माननीय सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवडश्रेणीतील मान्यताप्राप्त स्थान निश्चितीच्या पोटी अदा करावयाची लक्षावधी रुपयाची वेतन फरकाची रक्कम भ्रष्ट हेतूची पूर्तता न झाल्याने, शासनाकडून अनुदान उपलब्ध झालेले असताना, शिक्षकांना अदा न करता दिनांक ३१ मार्च, २००४ ला विशेष समाजकल्याण अधिकारी अमरावती, यांनी परत शासनाकडे पाठविली अशी सर्व पुराव्यानिशी तक्रार करणारे एक निवेदन समाजकार्य महाविद्यालय, अमरावती येथील शिक्षकांनी मा. मंत्री सामाजिक न्याय यांचेकडे ७ जुलै, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान विभागीय समाजकल्याण अधिकारी अमरावती विभाग, अमरावती यांच्या मार्फत सादर केले, हे खरे आहे काय,

(२) याबाबत विभागीय समाजकल्याण अधिकारी अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक २० जानेवारी, २००५ च्या पत्रान्वये जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना ताकीद दिली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत हंडोरे** : (१) नाही.

(२) समाजकार्य महाविद्यालयीन कर्मचा-यांची वेतन निश्चिती प्रकरणे विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती यांजकडून दिनांक ३१ मार्च, २००४ पर्यंत तपासून झाली नाही. त्यामुळे अमरावती कार्यालयातील शिल्लक तरतूद समर्पित करण्यात आली. त्यानंतर विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती यांनी दिनांक २० जानेवारी, २००५ च्या पत्रान्वये सदर पडताळणी प्रकरणे तपासून पाठविली. उक्त पत्रान्वये विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती यांनी सदरची थकबाकी राशी अदा करणेबाबत कार्यवाही करण्यास विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, अमरावती यांना सुचना दिलेल्या होत्या. परंतु सन २००४-०५ मध्ये पुरेश्या तरतूदी अभावी सदरचे देयक प्रलंबित राहिले.

(३) मात्र सन २००५-०६ मध्ये पुरेशी तरतूद उपलब्ध झाली असल्याने समाजकार्य महाविद्यालय, अमरावती येथील शिक्षकांचे स्थान निश्चितीपोटी अदा करावयाची वेतन फरकाची थकबाकी रक्कम रुपये १५०७५६९/- समाजकार्य महाविद्यालयाला धनादेश क्र. ४१९४८६, दिनांक २२.११.२००५ अन्वये अदा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला महागाई भत्ता राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना देण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५*

*गुरुवार , दिनांक ८ डिसेंबर २००५*

(४८) * ९२९८ **श्री. रमेश निकोसे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, डॉ. वसंत पवार, श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. जगन्नाथ शेवाळे, श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक** : सन्माननीय वित्त मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या संदर्भात दिनांक ७ ऑक्टोबर २००५ च्या शासननिर्णयान्वये केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, २००५ पासून लागू करण्यात आलेली ४ टक्के महागाई भत्ता वाढ राज्यातील शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना तसेच सेवानिवृत्ती वेतन धारकांना लागू करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(२) शासनाने निर्णय घेतला असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील** : (१) व (२) राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : मभवा-११०५/ प्र.क्र.९/सेवा-९, दिनांक ८.११.२००५ आणि सेवानिवृत्ती वेतन धारकांना शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निमवा १००५/१२९/सेवा-४, दिनांक ८.११.२००५ अन्वये ४ टक्के महागाई भत्ता वाढ दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पासून लागू करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

This is a very important task which I should strongly recommend for acceptance by teachers' organisations. There is no dearth of talented elements amongst us for this purpose and their services have to be properly mobilised. So, side by side with our movement demanding proper representation of teachers' organisations in academic bodies set up by the Government, if we can proceed in this direction and correctly intervene, even the most recalcitrant governments-state or central may be forced to change their negative stand in the matter.

**IDEOLOGICAL: POLITICAL TASKS:**

Teachers' organisations have important ideological - political tasks to perform. To day in India in the context of growing offensive of casteiest, communalist and regional disruptionist forces, this task has assumed increasing importance. India's nationally accepted ideals of democracy and secularism which became a part and parcel of the deep consciousness of Indian people during the struggle for Independence are today under fierce attack from the communal, casteist, reactionary vested interest and unfortunately a section of teachers and students also are influenced by pernicious anti-democratic ideologies In this context it is an important task of teachers organisations to resist this offensive and carry on a sustained ideological campaign in different forms amongst teachers and students in favour of our nationally accepted ideals. In certain parts of India the situation is really desperate and alarming and the teachers movement and organisations cannot afford to remain passive in this matter.

Similarly in the international sphere, there are burning questions of oppositions to nuclear war, fascism apartheid neocolonialist offensive or direct imperialist aggression in a number of the developing countries and support to and solidarity with the liberation struggle of a number of countries. On all these issues teachers' movement must be frankly partisan and not take passive or neutralist stand on the plea that teachers organisations are merely professional bodies dealing with problems concerning the teaching profession and nothing else. That would be absolutely wrong and will reduce teachers organisations to narrow craft bodies. So Indian teachers' movement has to unequivocally accept the position that they have important ideological political tasks to perform both in the national and international sphere.

It should not, however be forgotten that while there can be question of neutrality on behalf of a Teachers' organisation on the broad issues of fight against imperialism, fascism, racism, social and economic exploitation etc... **teachers' organisations have to maintain their broad united character and must not be handmaids of any political party and group of parties. Its politics must be irrespective of party affiliation, and as a mass organisation of teachers it should not try to advocate any political position, on which there is difference among democratic forces.** That will split the teachers movement and must be avoided.

**FIGHTING ILLITERACY:**

In addition to the ideological - political tasks stated above, **a very important task of the teachers movement in our country is to conduct extensive - illiteracy drive amongst the masses of workers and peasants in collaboration with the students.** This is a task which is very important and which the teachers organisations are unfortunately badly neglecting. It should be understood, that in a developing country like ours, with its colonial past and vast backlog of illiteracy and cultural backwardness, teachers organisation representing very important section of intelligentsia have a special role to play in this all important activity. **It should also be remembered that the masses of illiterates in our country are the most exploited section in society and the anti illiteracy movement, properly conducted, has a deep democratic significance. So the continuing apathy of teachers organisations on this vital matter should go.**

I have stated above the broad tasks of teachers movement but these different tasks are not isolated fragmental ones - they together constitute an integral whole, and a proper orientation of teachers movement will be achieved only through simultasneous performance of these tasks. In this connection a few points should be stressed.

Firstly there are two distinctly different and opposit orientations in the International teachers movement of today which have naturally their reflection in the national sphere. One strongly held view is that teachers organisations are

# UNIVERSITY GRANTS COMMISSION

**Bahadur Shah Zafar Marg, New Delhi – 110 002**

**No. F.1-16/2002 (PS) Dated : 2 December, 2005**

The Registrar,
Sant Gadge Baba Amravati University,
Amravati - 444 602. Maharashtra.

**Sub :-** Regarding appointments made during 19.9.1991 to 30.12.1999, of the lecturers without having NET/SET qualifications- Hon'ble Supreme Court Judgment dated 8th September, 1994 in Civil Appeal No. 1819 of 1994.

Sir,

With reference to your letter No. AU/8/10/C-1437/2005 dated 29.6.05 on the above subject, I am directed to say that the cases of teachers appointed during 19.9.1991 to 30.12.1999 and who do not have the minimum eligibility as per UGC norms have to be sent for placing before the Exemption Committee for exemption from NET However, prior to issue of UGC's regulations dated 19th September, 1991 NET was not compulsory for the candidates for the post of Lecturer. As such the para as indicated by the University pertains to the appointments made before 19th September, 1991 and since 19th September, 1991, NET/SET is one of the compulsory requirement for appointment to the post of Lecturer. The regulations on minimum qualifications issued by the UGC are mandatory in nature and all the universities are advised to strictly comply with them. I shall be necessary for the universities and the management of colleges to make the necessary changes in their statutes, ordinances, rules, regulations etc. to incorporate these regulations.

Yours Faithfully,
**(Mrs. Shashi Munjal)**
Under Secretary

merely professional organisations - these will deal only with pedagogic academic problems, and issues concerning service condition of teachers. They should have nothing to do with politics and should be strictly neutral in matters concerning politics. Of course, if there is any attack on service conditions, or professional rights, teachers organisations will have to defend the interest of teachers, but they must not go beyond that. The other view which has been stated earlier is that teachers organisations & teachers movement must not be purely professional and apolitical; it has manifold responsibilities and tasks - trade union, academic professional, ideological - political etc.

The latter view is increasingly gaining ground in the international teachers movement as well as in our country. **It is being increasingly realised that teachers movement and teachers organisations have their responsibility towards society and the common people.** Further, in order even to achieve their own sectional demands teachers have an interest in uniting with other workers and securing relations of alliance and unite with them. Again teachers organisations on their part will have support the activities of the workers and people for the establishment of equitable economic relations based on justice for putting an end to the exploitation of the resources of the developing countries by multinational corporations. As stated above Indian teachers movement is increasingly accepting this correct orientation of teachers movement, but this consciousness must go deep down amongst the masses of teachers and for that active efforts have to be made by the leadership of teachers movement through holding seminars conventions etc.

Secondly, though there will naturally be debates and even ideological confrontation between the advocates of the *two* opposing trends, this must be conducted in a friendly manner, through constructive dialogues. And it must not be forgotten for a moment that in spite of this sharp difference in teachers movement based on differing ideological orientation, there is a big measures of agreement in the entire teachers movement of the world, which provides every good basis for unity of action on a wide scale both internationally and nationally 'All Teachers' organisations are confronted with common problems, defence of the material and moral interest of their members, democratising and advancing education and resolving professional and pedagogical problems' In the international field already there have been some common moves by the World Federation of Teachers Union (FISE) with winch AIFUCTO & its constituents are affiliated and the WCOTP and happily this is growing phenomena.

In India the problem of unity of Indian Teachers movement has assumed very great importance today and there is objective basis for that.

At this last conference of AIFUCTO it was decided that AIFUCTO should take the initiative in contacting national teachers organisations of other sectors, so that a national conference can be convened at the earliest possible date, to prepare a common charter of demands of Indian teachers on the basis of which a common movement may be built up. AIFUCTO has already contacted these national bodies and the recent anti teacher offensive by the Central Government in the shape of the 'Hospital and Educational Institutions Bill 1978' has already given a new spurt to the unity of action of Indian teachers of different sectors. In a number of states, joint Federation or confederation of state level teachers organisations have been formed and in the context of the offensive of the vested interest this trend will further grow.

"From unity of action to unity" with this perspective Indian teachers' movement has to proceed, and all efforts should be made by all of us to bring about this happy culmination; co-operation, unity and solidarity - let these be the watch-wards of Indian teachers' movement.

*(This article was published in the first issue of TEACHERS' MOVEMENT August 1980 and was the last article written by late Prof. Amiya Das Gupta and was presented at WBCUTA seminar held at Jalpaiguri on* 14-4-1979.

******

# UNIVERSITY GRANTS COMMISSION

**Bahadur Shah Zafar Marg, New Delhi – 110 002**

**Ph. 23238872 : No. F.1-1/2005 (PS) : Dated : January, 2006 : Speed Post**

The Registrar,
University of Pune, PO University,
Pune- 411 007.

**Sub :-** Relaxation from SET/NET for Lecturers in Arts / Science / Commerce / Education / Law College - reg.

Sir,

I am directed to say that UGC's considering specific requests received from various Universities for granting exemptions from NET for appointment as Lecturers as per provisions laid down under UGC Regulations, 2000 on Minimum Qualifications for Appointment and Career Advancement of Lecturers, Readers and Professors in the Universities and Colleges through a duly constituted Standing Exemption Committee. The Commission while considering the minutes of the last Exemption Committee meeting held on 11th & 12th April, 2005 at Mumbai, at its meeting held on 8th December, 2005 resolved as under :-

**"It was informed by the representative of MHRD that the Govt. has appointed a committee under the Chairmanship of Prof. B.L.Mungekar to consider the issue regarding NET as eligibility condition for appointment of Lecturers. The Commission decided that this issue may be kept in abeyance till the report is received from the Committee appointed by the Government.**"

Keeping in view the aforesaid resolution of the Commission, it has been decided that till such time the MHRD takes a decision based on the recommendations of 'Mungekar Committee' the granting of exemption from NET in respect of maharashtra State as well as other than Maharashtra State cases is being kept on hold by the UGC.

This may also be brought to the notice of the institutions/Colleges affiliated to your University.

Yours Faithfully,
**(Mrs. Shashi Munjal)**
Under Secretary

# सुधारित वेतनश्रेणीत निवृत्त होणे पण असुधारित वेतनश्रेणीचे निवृत्तीवेतन

*महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार, २१ मार्च २००६ : पहिले अधिवेशन २००६*

(३) * १३१०९ **प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.अैनापूरे** : दिनांक १६ डिसेंबर, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या सोमवार, दिनांक १९ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक ९८१३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांच्या बाबतीत १७ जानेवारी २००४ च्या शासननिर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेली असली तरी त्याबाबत महालेखाकार कार्यालयाला कोणत्याही सूचना पाठविण्यात आलेल्या नसल्यामुळे ते सुधारित वेतनश्रेणीत निवृत्त होत असले तरी त्यांचे सेवानिवृत्ती वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार निश्चित करण्यात येत नाही असे उपमहालेखाकार (नागपूर) यांनी १० मार्च २००५ रोजी सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना पत्र (क्रमांक पीआर ४/आर ५/ओसी/४००/०४-०५) पाठवून कळविले तसेच शेकडो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यामुळे सेवानिवृत्ती वेतन निश्चितीमध्ये अकारण अडचणी निर्माण होत आहेत अशी तक्रार करणारे एक निवेदन महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटनेच्या सरचिटणीसांनी दिनांक ३/२९ ऑक्टोबर २००५ रोजी किंवा त्यादरम्यान प्रधान सचिव तंत्र शिक्षण विभाग यांना सादर केलेल्या तक्रारीच्या संदर्भात आवश्यक ती अधिसूचना निर्गमित करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(३) असल्यास उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांचेकरिता** : (१), (२) व (३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांना दि. १७ जानेवारी, २००४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करतांना काही अडचणी निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे या शासन निर्णयात सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. त्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. सुधारणा झाल्यानंतर वित्त विभागामार्फत अधिसूचना निर्गमित करण्यात येईल. अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर मा. महालेखापाल यांचेकडून सेवानिवृत्ती वेतन निश्चितीची प्रकरणे निकाली काढणे शक्य होईल. ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने काही कालावधी लागत आहे.

**श्री. सुरेश शेट्टी** : सभापती महोदय, मला या उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करावयाची आहे. या उत्तरामध्ये "…. त्यानुसार दिनांक २० मार्च २००६ ला शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन शुद्धीपत्रिका निर्गमित करण्यात आली आहे. वित्त विभागास सदर शासन निर्णयानुसार अधिसूचना निर्गमित करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे." असा मजकूर उत्तराच्या शेवटी मला जोडावयाचा आहे. याप्रमाणे उत्तर दुरुस्त करुन छापल्याप्रमाणे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मुळ उत्तर ऐतिहासिक उत्तर आहे. पण आता दुरुस्तीमुळे थोडीशी गडबड झाली आहे. मला वाटले होते की, या प्रश्नाचे ऐतिहासिकपण गमावले जाते की काय? पण तसे झाले नाही. सभापती महोदय, या प्रश्नाचे ऐतिहासिकपण यासाठी आहे की, गेल्या २०-२५ वर्षामध्ये मी पहिल्यांदाच असे पाहतो आह की, शासन निर्णय काढला, त्याप्रमाणे वेतनश्रेणी दिली गेली. त्याप्रमाणे संबंधितांना ती वेतनश्रेणी मिळूही लागली. पण तो मनुष्य निवृत्त झाल्यावर मात्र त्याला असे सांगितले जाते की, तुम्हाला जुन्या स्केलप्रमाणे निवृत्ती वेतन मिळेल. सभापती महोदय, महालेखाकारांनी शासनाला असे कळविले आहे की, "I am, therefore, to request you to kindly issue necessary instructions in this regard." यामध्ये खरे म्हणजे अडचण काही नाही. चुकीची वेतनश्रेणी दिली होती . पण नंतर दुरुस्ती करणारा जी.आर. यांनी काढलेला आहे. त्यांच्याकडे देखील चूक झालेली होती. माननीय मंत्री महोदयांनी स्वतः लक्ष घालून १७ जानेवारी २००४ चा शासन निर्णय निर्गमित केला, त्याप्रमाणे सभागृहामध्ये सांगितले आणि त्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन मिळू लागले. पण त्यांचे पेन्शन मात्र जुन्याच स्केल प्रमाणे निश्चित होते आहे. त्यामुळे ही सारी पेन्शनर मंडळी अत्यंत त्रस्त झालेली आहेत. आता खरे तर मी वेगळाच प्रश्न येथे विचारणार होतो. पण तो मी आता विचारीत नाही. मी असे विचारणार होतो की, वित्त विभागाचे जे काही व्हायचे असेल ते होऊ द्यात. पण जे तुम्ही केले आहे ते तरी तुम्ही त्यांना म्हणजे अे.जी.ना कळवा. पण आता ते पुढे गेलेले दिसते आहे. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, हे जे आहे, इंडियन ऑडिट ॲन्ड अकौंट्स डिपार्टमेंट, **ऑफिस ऑफ द अकौंटंट जनरल महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांनी आपल्याला पत्र लिहिले आहे. यांना आपण सुधारित प्रमाणे पेन्शन देण्याविषयी अधिसूचना किती तारखेला पाठविणार आहात?**

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, ए.जी.ला जी अधिसूचना पाठवावयाची आहे ती वित्त विभागाने पाठवावयाची आहे. वित्त विभागाने आमच्या विभागाला विनंती केली होती की, या संदर्भातील अधिसूचनेचे स्वरुप काय असायला पाहिजे ते तुम्ही आम्हाला कळवा. २० मार्च २००६ ला या संदर्भातील जी.आर. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढून वित्त विभागाला पाठविला आहे आणि वित्त विभागाकडून येत्या १५ दिवसात ही अधिसूचना ए.जी.कडे जाईल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माझे समाधान झाले आहे.

******

## सुधारित वेतनश्रेणीत निवृत्त होणे पण असुधारित वेतनश्रेणीचे निवृत्तीवेतन मिळत असल्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५*
*शुक्रवार , दिनांक १६ डिसेंबर २००५*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या सोमवार, दिनांक १९ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितीलतारांकित प्रश्न क्रमांक*

**(११) * ९८१३ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांच्या बाबतीत दिनांक १७ जानेवारी,२००४ च्या शासननिर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेली असली तरी त्याबाबत महालेखाकार कार्यालयाला कोणत्याही सूचना पाठविण्यात आलेल्या नसल्यामुळे ते सुधारित वेतनश्रेणीत निवृत्त होत असले तरी त्यांचे सेवानिवृत्ती वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार निश्चित करण्यात येत नाही असे उपमहालेखाकार (नागपूर) यांनी दिनांक १० मार्च, २००५ रोजी सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना पत्र (क्रमांक पीआर ४/आर ५/ओसी/४००/०४-०५) पाठवून कळविले हे खरे आहे काय,

(२) शेकडो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यामुळे सेवानिवृत्ती वेतन निश्चितीमध्ये अकारण अडचणी निर्माण होत आहेत अशी तक्रार करणारे एक निवेदन महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटनेच्या सरचिटणीसांनी दिनांक ३/२९ ऑक्टोबर, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान प्रधान सचिव, तंत्र शिक्षण विभाग यांना सादर केले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(४) उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) व (२) होय.

(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांना दिनांक १७ जानेवारी, २००४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार वेतननिश्चिती करण्यासाठी वित्त विभागाकडून शासन अधिसूचना निर्गमित होणे आवश्यक आहे. सदरहू अधिसूचना निर्गमित न झाल्यामुळे सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतननिश्चिती होत नसल्याचे महालेखापालांनी कळविले आहे. आवश्यक अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

******

(१)

# वरिष्ठ श्रेणीसाठी अर्हताकारी सेवा मोजतांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक.

*पहिले अधिवेशन २००५ : गुरुवार, दिनांक २४ मार्च, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*

(१) * २५४० **श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे, प्रा. शरद पाटील** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २५ मार्च,१९९४ च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासननिर्णयातील "**वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षांची अर्हताकारी सेवा**" ही अट शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २२ जानेवारी १९९३ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागाने दिनांक १२ डिसेंबर,१९९४ रोजी शुध्दीपत्रक काढून वगळण्यात आली परंतु दिनांक १ जानेवारी २००० च्या शासननिर्णयात मात्र ती अट न वगळण्याचा हा दोष राहून गेल्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जात आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने मा.उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर,२००४ रोजी किंवा त्या दरम्यान सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ मे,१९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी "नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा" व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना दिनांक १ जानेवारी २००० च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासननिर्णयाने "प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची सेवा" अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था आज कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केलेली नसल्यास याबावत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ? .

**श्री.सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिताः** (१) होय.

(२) नाही. अशासकीय अनुदानीत संस्थेतील अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणा-या शिक्षकांना दिनांक २५ मार्च,१९९४ च्या शासन निर्णयान्वये द्विस्तरीय वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. तसेच या शासन निर्णयास अनुसरुन निर्गमित केलेल्या दिनांक १२ डिसेंबर,१९९४ च्या शुद्धिपत्रकान्वये वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह बारा वर्षाची अर्हताकारी सेवा (उच्च माध्यमिक स्तरावर ) या अटी ऐवजी उच्च माध्यमिक स्तरावर नेमणूकीच्या दिनांकापासून पूर्ण १२ वर्षे झालेली सेवा विचारात घ्यावी असे आदेशीत करण्यात आले आहे.

(३) व (४) दिनांक १ जानेवारी,२००० च्या शासन निर्णयामध्ये वरील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**श्री.वसंतराव खोटरे :** सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, दिनांक २५ मार्च, १९९४ च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासन निर्णयातील "वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षांची अर्हताकारी सेवा" ही अट शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २२ जानेवारी, १९९३ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागाने दिनांक १२ डिसेंबर, १९९४ रोजी शुध्दीपत्रक काढून वगळण्यात आली. माझा प्रश्न असा आहे की, कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकाप्रमाणे या शिक्षकांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून १२ वर्षानंतर देण्यात आली. त्याप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना १२ डिसेंबर, १९९४ च्या शुध्दीपत्रकानुसार देण्यात येईल काय, यामध्ये शासनाने उत्तर दिले आहे परंतु ते ठोस उत्तर नाही. त्यासंबंधीचे आदेश केव्हा काढणार आहात ?

**श्री.सुरेश शेट्टी :** या विषयासंबंधी दोन दिवसापूर्वीच या सदनामध्ये चर्चा झाली होती त्यावेळी मी आश्वासन दिले होते की, हे अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट याच्यावर निर्णय करु. हे आश्वासन रेकॉर्डवर आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** अधिवेशन संपल्यानंतर कार्यवाही करु असे म्हणण्याची आवश्यकता नाही. आज हा पहिला प्रश्न आहे. यामध्ये धडधडीत असत्य उत्तर देण्यात आलेले आहे. आम्ही प्रश्न क्र.२ मध्ये असे विचारले होते की, दिनांक १३ मे, १९९९ च्या शासन निर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी "**नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा**" व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना दिनांक १ जानेवारी, २००० च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णयाने "**प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची सेवा**" अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था आज कार्यरत आहे, ही गोष्ट खरी आहे काय, याला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा हे उत्तर दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे असे आपल्याला वाटत नाही का ?

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, जे लेखी उत्तर दिले आहे ते ठीक आहे. मा.सदस्यांनी जी मागणी केलेली आहे त्याबाबत मी आश्वासन देऊ इच्छितो की, यासंबंधी आम्ही पॉझिटिव्ह निर्णय घेणार आहोत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदय दिलेले उत्तर ठीक आहे असे म्हणत आहेत. वास्तविक मी त्यांना उत्तर दुरुस्त करण्याची संधी देऊनही ते त्याच उत्तरावर ठाम आहेत म्हणून मी आता पुढील प्रश्न विचारतो. दिनांक १२ डिसेंबर, १९९४ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे जी दुरुस्ती केली ती दिनांक १.१.२००० मध्ये केली नाही हे खरे आहे काय ?

**श्री.सुरेश शेट्टी : हे खरे आहे. या जी.आर.मध्ये थोडीशी दुरुस्ती करण्याचे राहिले आहे.** त्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे यावर आणखी चर्चा कशासाठी करावयाची ? यासंबंधी आम्ही पॉझिटिव्ह निर्णय घेणार आहोत हे मी मघाशीच सांगितले आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** चर्चा करण्याची आवश्यकता आहे. येत्या ८ दिवसामध्ये, १०-१५ दिवसामध्ये यासंबंधीचा आदेश निघणार आहे काय ?

**श्री.सुरेश शेट्टी :** अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट हे आम्ही करु.

**प्रा.बी.टी.देशमुख :** अधिवेशन संपल्यानंतर ८ दिवसात १०, १५ दिवसामध्ये दुरुस्ती करणारा शासन निर्णय निघेल काय ?

**श्री.सुरेश शेट्टी :** ठीक आहे, ७ दिवसामध्ये आम्ही करु.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** या शिक्षकांच्या संदर्भात अधिवेशन संपल्यानंतर ७ दिवसात शासननिर्णय निर्गमित होईल असे मा.राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. माझा पूरक प्रश्न असा आहे की, याच विभागामध्ये ह्या शिक्षकांच्या बरोबरीने काम करणारे निदेशक आहेत. शिक्षक आणि निदेशक हे एका विभागामध्ये आणि एका युनिटमध्ये काम करतात. त्यांना मात्र ही वेतनश्रेणी दिली गेली नाही. प्रत्येक प्रश्नासाठी सातत्याने याठिकाणी येता येत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या शिक्षकांच्या निर्णयासोबतच निदेशकांच्या बाबतीतही १२ वर्षाच्या संदर्भातील निर्णय घेतला जाईल काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** होय.

*****

(२)

## वरिष्ठ श्रेणीसाठी आर्हताकारी सेवा मोजतांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००५*
*शुक्रवार, दिनांक १५ जुलै, २००५*

(७) * ५५८७ **श्री. रामदास तडस, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५४० ला दिनांक २४ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षक-निदेशकांना शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकांप्रमाणे नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी मंजुर करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाला आहे काय,

(२) असल्यास, केव्हा, व आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, याबावत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१),(२) व (३) **नेमणुकीच्या दिनांकापासून बारा वर्षाची अर्हता प्राप्त सेवा पूर्ण केल्यानंतर वरिष्ठ श्रेणी मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि सेवा योजन विभाग**

क्र.पीटीएस-२२९२/६५६३९/(२३६५)/व्यशि-४, दिनांक २५ मार्च, १९९४ व याबाबतचे शासन सम क्रमांकित दिनांक २२ डिसेंबर, १९९४ चे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक टीएसए-१०९९/(१८८०)/ व्यशि-२, दिनांक १ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** सभापती महोदय, हा प्रश्न या सभागृहात दोन ते तीन वेळा आलेला आहे. शालेय शिक्षण विभागाने कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून १२ वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केली आहे. एमसीव्हीसी आणि बायोफोकलमधील निदेशक आणि शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकांप्रमणे नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी मंजूर करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला नाही. या बाबत दि. २४.०३.२००५ रोजी मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी असा प्रश्न विचारला होता की, “दिनांक १२ डिसेंबर १९९४ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे जी दुरुस्ती केली, ती दिनांक १.१.२००० मध्ये केली नाही हे खरे आहे काय?” या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी ‘होय’ असे उत्तर दिले आहे. त्यानंतर पुन्हा माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी असा प्रश्न विचारला होता की, “येत्या ८ दिवसामध्ये, १०-१५ दिवसामध्ये यासंबंधीचा आदेश निघणार आहे काय?” असा प्रश्न विचारला होता. त्याला माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, “अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट हे आम्ही करु.” माननीय मंत्रिमहोदयांनी हे उत्तर २४ मार्च २००५ रोजी दिले आहे. आता सातवा महिना उजाडला आहे. माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी त्यावेळी पुन्हा असा प्रश्न विचारला होता की, “अधिवेशन संपल्यानंतर ८ दिवसात, १० दिवसात, १५ दिवसामध्ये दुरुस्ती करणारा शासन निर्णय निघेल काय?” या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, “७ दिवसामध्ये आम्ही करु.” एमसीव्हीसी आणि बायोफोकलमधील शिक्षक आणि निदेशकांचा हा प्रश्न आहे. अधिवेशन संपल्यानंतर सात दिवसामध्ये या बाबतची कार्यवाही पूर्ण होणार होती. आता तरी हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतची कार्यवाही पूर्ण होईल काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, आम्ही सुरुवातीलाच ही बाब मान्य केली आहे. ही बाब आम्ही करणार आहोत. परंतु हे काम पूर्ण करण्यासाठी कमीत कमी तीन महिने लागतील.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** सभापती महोदय, आता हा सभागृहाचा अवमान आहे. हे काम करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, कमीत कमी तीन महिने लागतील असे मी सांगितले आहे. तीन महिन्याच्या आत हे काम करणार आहोत.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** यापूर्वी टाईमबाऊंड आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी दिले असतांनाही आता तीन महिन्यांचा कालावधी का लागत आहे ? सभापती महोदय.....

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, मला या ठिकाणी एक गोष्ट सदनाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे. चुका सुध्दा रिपीट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय ? चवथ्या वेतन आयोगाच्या वेळी शालेय शिक्षण विभागाने जी चूक केली होती, ती आता या विभागाने केली आहे. चवथ्या वेतन आयोगाच्या वेळी शालेय शिक्षण विभागाने प्रशिक्षणापासून सेवा धरली होती. आपण ती नेमणूकीपासून धरली होती. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाने आपली चूक दुरुस्त केली आहे. आता शालेय शिक्षण विभागाने जी चूक केली नाही, ती आपण केली आहे. सभापती महोदय, २२ डिसेंबर १९९४ रोजी शुध्दिपत्रक काढण्यात आले तसेच शुध्दिपत्रक काढण्यामध्ये अडचण काय आहे? आणि नेमके काय विचाराधीन आहे? २२ डिसेंबर १९९४ जे शुध्दिपत्रक चौथ्याला काढण्यात आले,आणि आता पाचव्याला शुध्दिपत्रक काढण्यात काही अडचण नाही. माझे असे म्हणणे आहे की, हे विचाराधीन आहे असे म्हणण्यापेक्षा सुरुवातीपासून धरायचे की, प्रशिक्षणापासून धरायचे एवढाच प्रश्न आहे. सभापती महोदय, हळू हळू ही एक फॅशन व्हायला लागली आहे. या ठिकाणी फक्त दुरुस्ती करावयाची आहे. ती करण्यामध्ये आपल्याला निश्चित अडचण अशी काय आहे? आणि ती अडचण येणार नसेल तर आपण एक महिन्यात करणार काय?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, हे दोन हजार शिक्षक आहेत आणि ९५८ संस्था आहेत. त्यांच्याकडून सर्व माहिती घ्यावी लागेल व ती तपासावी लागेल, त्यासाठी वेळ लागेल. त्यामुळे कमीत कमी आणि जास्तीत जास्त तीन महिन्यामध्ये आम्ही ही प्रोसेस पूर्ण करु.

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, मंत्रिमहोदय दुर्दैवाने या ठिकाणी चुकीची माहिती देत आहेत. इथे माणसे मोजायचा प्रश्न नाही. माणसे मोजण्याचा प्रश्न ॲरिअर्स करतांना आणि पे फिक्सेशन करतांना येतो. नेमणूकीपासून धरायचे की प्रशिक्षणापासून धरायचे याचा मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाला आहे. इथे धोरणाचा प्रश्न आहे. तुम्ही चौथ्याच्या वेळेला क्लॅरिफिकेशन काढले..

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, फक्त इंम्प्लिमेंटेशन करण्याचा प्रश्न आहे. त्यासाठी आम्ही तीन महिन्यांचा कालावधी मागत आहोत.

**प्रा. बी. टी. देशमुख :** तसे असेल तर बरोबर आहे. आम्ही आपल्याला इंम्प्लिमेंटेशन करण्यासाठी तीन महिन्यांचा वेळ देतो. परंतु क्लॅरिफिकेशन आपण किती महिन्यात काढणार? क्लॅरिफिकेशन एक महिन्यात निघेल काय?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, होय.

*****

## (३)

## वरिष्ठ श्रेणीसाठी अर्हताकारी सेवा मोजतांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था संपुष्टात आणण्याबाबत

***महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५***

***मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २००५***

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील तारांकित प्रश्न क्रमांक*

(९) * ९२९५ **श्री. रमेश निकोसे, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते तारांकित प्रश्न क्रमांक ५५८७ ला दिनांक १५ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) २५ मार्च, १९९४ च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासननिर्णयातील “वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची अर्हताकारी सेवा” ही अट शालेय शिक्षण विभागाच्या २२ जानेवारी १९९३ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागातर्फे १२ डिसेंबर, १९९४ रोजी शुध्दीपत्रक काढून वगळण्यात आली परंतु १ जानेवारी २००० च्या शासननिर्णयात मात्र ती अट न वगळण्याचा हा दोष राहून गेल्यामुळे व्यावसायिक अभ्याक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जात आहे या तक्रारीची दखल घेवून १ जानेवारी, २००० च्या शासननिर्णयामध्ये सुधारणा करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) झालेला असल्यास, १३ मे, १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी “नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा” व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना १ जानेवारी, २००० च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासननिर्णयाने “प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची सेवा” अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था संपुष्टात आणण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(३) उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : १) दिनांक १ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

२) व ३) शालेय शिक्षण विभागांतर्गत पूर्णवेळ शिक्षक आणि व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत पूर्णवेळ शिक्षक यांच्या शैक्षणिक अर्हता व अनुभव यात फरक आहे. शालेय शिक्षण विभागाप्रमाणे व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत पूर्णवेळ शिक्षकांना वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी लागू करतांना विहित अटी व शर्ती जशाच्या तशा लागू केल्यास शासनावर अधिकचा आर्थिकभार पडणार आहे. तसेच विहित अर्हता व अनुभवधारक शिक्षकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. भविष्यात याप्रकरणी प्रशासकीय अडचणी निर्माण होवून एकाच संस्थेत कार्यरत अपूर्ण अर्हता व अनुभवधारक व पूर्णतः अर्हता व अनुभवधारक यांच्यात भेदभाव निर्माण होवू नयेत, म्हणून ही बाब शासन स्तरावर सखोलपणे तपासण्यात येत असून त्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

******

# SILVER JUBILEE OF TEACHERS' MOVEMENT

**Prof. Mrinmoy Bhattacharyya**

General Secretary, FISE

After the sad and sudden demise of Prof Amiya Dasgupta, the then general Secretary of AIFUCTO the National Executive Committee in its meeting held at JNU, New Delhi on 27-4-1980 elected me as the general secretary of AIFUCTO till the next annual conference. At that time office-bearers were elected for just one term and conferences were scheduled to be held every year. In reality however conferences were held after 15 or 18 months and at any time of the year depending on the convenience of the host organisation.

In 1980 I had already served AIFUCTO as an Assistant Secretary and then Joint Secretary for seven years and for quite some time I strongly felt about publishing a regular journal. When I became the general secretary I found myself in a position to do so. The National Executive Committee fully endorsed my views.

**So, the first issue of Teachers' Movement** (that is the name we chose for our journal and got the name registered with the Press Council of India), a quarterly organ of AIFUCTO **was published in August, 1980.** For the next 25 years Teachers' Movement has come out without interruption. Prof. B. Vijaykumar my successor to the office of General Secretary has made Teachers' Movement a monthly.

Twenty five years make a long enough time to allow nostalgic feeling. National and international situation were also different at that time. It was a still a bipolar world. Imperialist forces had to reckon with the mightly Soviet

---

### (४)
### वरिष्ठ श्रेणीसाठी अर्हताकारी सेवा मोजतांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक

***महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन , २००६***

***शनिवार , दिनांक १८ मार्च २००६***

(९) * १२८६४ **श्री. नतिकोदीन खतिब, प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.ऐनापूरे :** दिनांक ६ डिसेंबर २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक ९२९५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१) दिनांक २५ मार्च १९९४ च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासननिर्णयातील "वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची अर्हताकारी सेवा" ही अट शालेय शिक्षण विभागाच्या २२ जानेवारी १९९३ च्या शुद्धीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागातर्फे १२ डिसेंबर १९९४ रोजी शुद्धीपत्रक काढून वगळण्यात आली परंतु १ जानेवारी २००० च्या शासननिर्णयात मात्र ती अट न वगळण्याचा हा दोष राहून गेल्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जात आहे या तक्रारीची दखल घेवून दिनांक १ जानेवारी २००० च्या शासननिर्णयामध्ये सुधारणा करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

२) झालेला असल्यास, १३ मे १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी "नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा" व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना १ जानेवारी २००० च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासननिर्णयाने "प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची सेवा" अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था संपुष्टात आणण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

३) उपाययोजना केलेली नसल्यास याबावत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) शालेय शिक्षण विभागांतर्गत पूर्णवेळ शिक्षक आणि व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत पूर्णवेळ शिक्षक याच्या शैक्षणिक अर्हता व अनुभव यामध्ये तफावत आहे. शालेय शिक्षण विभागाप्रमाणे व्यवसाय शिक्षण विभागातील पूर्णवेळ शिक्षकांना वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी लागू करतांना विहीत अटी व शर्ती जशाच्या तश्या लागू केल्यास शासनावर अधिकचा आर्थिक भार पडणार आहे. त्याचप्रमाणे विहीत अर्हता व अनुभव धारक शिक्षकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. भविष्यात या प्रकरणी प्रशासकीय अडचणी निर्माण होऊन एकाच संस्थेत कार्यरत अपूर्ण अर्हता व अनुभव धारक आणि पूर्ण अर्हता व अनुभव धारक यांच्यात भेदभाव निर्माण होवू नये म्हणून सदर बाब शासन स्तरावर सखोलपणे तपासण्यात येत असून, त्यास अद्यापही काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. सदर बाब तपासून दिनांक १ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

******

---

### थकबाकी अदा करण्याच्या बाबतीत कार्यालय प्रमुखांनी जबाबदारी पार न पाडल्याबाबत

***महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५***

***सोमवार , दिनांक १२ डिसेंबर २००५***

(१३) * ९७७२ **श्री. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. नानासाहेब बोरस्ते** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधारित वेतन श्रेणीपोटीच्या दिनांक १ जानेवारी १९९६ ते दिनांक ३१ मार्च २००४ या काळातील थकबाकीपैकी ५० टक्के रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी अशी स्पष्ट तरतूद दिनांक १७ जानेवारी, २००४ च्या शासन निर्णयामध्ये असूनसुद्धा त्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही अशी तक्रार करणारे एक निवेदन महाराष्ट्र राज्य आय.टी.आय निदेशक संघटनेच्या सरचिटणीसांनी दिनांक ३/२८ ऑक्टोबर २००५ रोजी किंवा त्यादरम्यान प्रधान सचिव, तंत्र शिक्षण विभाग यांना सादर केले हे खरे आहे काय,

(२) उर्वरित ५० टक्के रक्कम १० वर्षाच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने देण्यात येईल व या रकमेचे समान टप्पे ठरविणे व ते अदा करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील अशी स्पष्ट तरतुद उपरोक्त शासननिर्णयात असतांना एकाही कार्यालय प्रमुखाने उक्त जबाबदारी पार पाडली नाही अशी तक्रार सुद्धा उक्त निवेदनामध्ये करण्यात आलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीवर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) उपाययोजना अद्याप केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) व (२) होय.

(३) व (४) दिनांक १७ जानेवारी, २००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यानुसार सुधारित वेतननिश्चिती करतांना काही अडचणी निदर्शनास आल्या आहेत, त्याप्रमाणे शासन निर्णयात सुधारणा करण्यात येत आहे. तसेच याबाबत अधिसूचना काढणे आवश्यक आहे. दिनांक १७ जानेवारी, २००४ च्या शासन निर्णयातील तदतुदींनुसार व्यवसाय शिक्षण विभागातील कर्मचा-यांना द्यावयाच्या थकबाकीसाठी रुपये ५५,९६,१३,०००/- इतक्या रकमेच्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव सन २००५ च्या पावसाळी अधिवेशनात विधीमंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. पावसाळी अधिवेशनात विधानमंडळाची मान्यता मिळू न शकल्याने सदर प्रस्ताव पुनश्च सादर करण्यात आला आहे.

******

Union. FISE was the foremost international teachers' union with its headquarters in Berlin the capital of German Democratic Republic. At the national level, Ms. Indira Gandhi had been re-elected as the Prime minister after a break of two and half years of Janata Dal coalition under Morarji Desai. AIFUCTO was gathering strength but had not reached its full capacity. The most worrisome was the financial condition of AIFUCTO. AIFUCTO had no bank-balance. We opened a new bank account and began a zero sum budget. Publishing a quarterly journal and maintaining its regularity meant a lot of additional work and of course expenditure.

It will be appropriate to recall persons who played important roles at that time. Some of them are unfortunately no more. Prof. Dilip Bhadury, Prof. Shibaprasad Sinha and Dr. Manindra Mohan Chakraborty were members of our editorial board. They have left us for ever. AIFUCTO office was located at that time in a small room on the ground floor of 15, Brindaban Mallik Lane, Kolkata the house of the then Treasurer Prof. Ajoy Banerjee. We used to receive press releases from the many embassies but most frequently from the embassy of the U.S.S.R Printing was only on one side. So, we used them to wrap copies of the Teachers' Movement meant for posting. **When new issue of Teachers' Movement reached our office it was a festive occasion. Five or six of us would work together. One would fold the journal. Another would wrap it with a slip of paper. The third teacher would cut the slip of the address. The fourth would paste address slip. The fifth would paste the postage stamp**. Finally the ready-to-be-postal copies of had to be strewn around for airing so that they did not get stuck. Among the volunteers in office we had Dr. Sambhunath Ganguly, Prof. Amulya Chandra Bhattacharya, Smt. Arati Lahiri, Dr. Subir Mukhopadhyay, Hironmoy Bhattacharya, and Prof. Mihir Singha Roy.

Dr. Subir Mukhopadhyay, now President of West Bengal College and University Teacher Association was the manager in charge of circulation He meticulously prepared state-wise lists of our subscribers, looked after proof-reading and gave the final print- order, finalised the despatch list for every issue and was present in the office upto 10 p.m. when copies of Teachers' Movement were being made ready for posting. He would be reaching home at Srirampur before midnight catching his train from Howrah. Subir accompanied me to many conferences, conventions and seminars with a bagful Teachers' Movement and receipt books to enrol new subscribers or renew subscription. Even in big rallies held in Delhi his job was to enrol subscribers of Teachers' Movement He would be assisted by others but often by Ms. Arati Lahiri on such occasions. Subir looked after accounts of Teachers' Movement Each year when AIFUCTO accounts were to be audited, he would submit Teachers' Movement accounts separately to be incorporated in it.

Of course Teachers' Movement was running at a loss and AIFUCTO had to subsidise its publication. We seldom got an advertisement. It was also difficult to maintain a respectable number of subscribers. It was very difficult to renew annual subscription. So, we introduced life membership. To begin with it was Rs 100/-. It was raised later increase in cost and fall in interest rate have caused financial loss for Teachers' Movement on this account. But this gave us a dependable number of subscribers. The practice has since been continued. Many leaders took initiative in enrolling life-subscribers. **I remember that Prof. B.T. Deshmukh, president of Nagpur University Teachers' Association (NUTA) moved a resolution in a meeting of its executive committee to make every member of NUTA executive committee a life-subscriber of Teachers' Movement.** Dr. V. K. Tiwari now National Secretary of AIFUCTO single-handedly collected largest number of life-subscription of Teachers' Movement Late Prof. P. Bhaskara Rao the undisputed leader of A.P.A.C.T.A. helped us in a big way by enrolling many life subscribers.

We decided that Teachers' Movement would not be merely a news bulletin. Each issue must contain some serious articles on issues related to education and unionism. Collecting articles of an acceptable quality was not easy. We often had to fall back upon old issues of Teachers of the World. We had also to commission few among us who could quickly contribute. Besides, we also published important documents We maintained a section "News from States", We covered major activities of constituent units of AIFUCTO.

During my tenure as the chief editor of Teachers' Movement it was published quarterly and hence could rarely announce future programmes, But it served the archival purpose. Events were reported, reviewed and analysed after they took place. This itself is not a small achievement. Now that the Teachers' Movement has been made monthly, it is even in a position to announce major programmes of AIFUCTO.

In a country like India so vast and varied it is not easy to function a national organisation like AIFUCTO. As an organisation of working people structured and functional on a non-partisan basis AIFUCTO has no parallel. There have been efforts more than once to split this united organisation. That such evil designs have not succeeded so far owe much to the Teachers' Movement. Teachers' Movement carries the message of AIFUCTO to hundreds of teachers who are not leaders of the state/university level organisations. Activity, achievement as also failures of the national organisation get objectively reported to the primary members directly. Even when a state/ university level organisation is weak on even non-functioning the link with that constituency still remains living. This has helped us to revive/ reactivate such organisations subsequently. Teachers' Movement is of course only a journal but the chief editor of it is the general secretary of AIFUCTO. Even with the limitations of a federation **Teachers' Movement has provided an opportunity to him / her to directly reach and address the primary members. Importance of Teachers' Movement can thus be hardly overemphasized.**

*Courtesy 'Teacher's Movement'*

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO.** NR/ATI/78/2002 Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **31.03.2006**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---------------------------------------------------

To,..........................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................